# VAISHYA SAHAKARI BANK LTD., MUMBAI
## HEAD OFFICE

**Ref No.: Branch Circular No.17/16/17/512** **Date: 24/06/2016**

| प्रेषक: प्रशासकीय विभाग, मुख्य कार्यालय | प्रति: सर्व शाखा व्यवस्थापक |
|---|---|
| विषय: सन २०१५-१६ मध्ये माध्यमिक व उच्च-माध्यमिक परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या बँकेच्या सभासदांच्या व कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचा गुणगौरव सोहळा. | |

बँकेच्या दि.१८ जून २०१६ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेमध्ये असा ठराव मंजूर करण्यात आलेला आहे की, बँकेच्या होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये माध्यमिक (इ.१० वी) व उच्च-माध्यमिक (इ.१२ वी) परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या बँकेच्या सभासदांच्या व कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचा गुणगौरव करण्यात यावा.

त्याअनुषंगाने, यावर्षी होणाऱ्या ७१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सदर गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आलेला आहे. तरी सदरकरीता खालील बाबींची पुर्तता होणे आवश्यक आहे:

| सन २०१५-१६ मध्ये झालेल्या परीक्षा | गुण आवश्यक | महत्वाची बाब |
|---|---|---|
| माध्यमिक शालांत परीक्षा (इ.१०वी) | ८०% वा त्यावरील गुण | पालक बँकेचे सभासद असणे आवश्यक |
| उच्च-माध्यमिक परीक्षा (इ.१२वी) | ७५% वा त्यावरील गुण | पालक बँकेचे सभासद असणे आवश्यक |

तरी, वर उल्लेख केल्याप्रमाणे गुणपत्रिकांच्या प्रती दि.२५ जुलै २०१६ रोजीपर्यंत बँकेच्या नजिकच्या शाखेच्या कामकाजाच्या वेळेमध्ये जमा करण्यात येतील. सोबत सदरबाबतची नोटीस देत असून सदर नोटीस शाखेच्या नोटीसबोर्डवर लावण्यात यावी. तदनंतर प्राप्त गुणपत्रिकांच्या प्रती तपासून घ्याव्यात व त्याचबरोबर त्यांचे पालक बँकेचे सभासद आहेत अथवा नाहीत, याची खातरजमा करूनच सदर गुणपत्रिका मुख्य कार्यालयात पाठविण्यात याव्यात. बँकेच्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांनाही सदर योजना लागू राहील.

आपला विश्वासू,

(संजय बा. आपिष्टे)
मुख्य कार्यकारी अधिकारी (प्र)

सोबत: वरीलप्रमाणे.

# सभासदांना सूचना

वैश्य सहकरी बँकेच्यावतीने होणाऱ्या ७१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सन २०१५–१६ मध्ये माध्यमिक (इ.१० वी) व उच्च–माध्यमिक (इ.१२ वी) परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या बँकेच्या सभासदांच्या व कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आलेला आहे.

तरी सदर गुणगौरव सोहळयासाठी खालील बाबींची पुर्तता होणे आवश्यक आहे:

| सन २०१५–१६ मध्ये झालेल्या परीक्षा | गुण आवश्यक | महत्वाची बाब |
|---|---|---|
| माध्यमिक शालांत परीक्षा (इ.१०वी) | ८०% वा त्यावरील गुण | पालक बँकेचे सभासद असणे आवश्यक |
| उच्च–माध्यमिक परीक्षा (इ.१२वी) | ७५% वा त्यावरील गुण | पालक बँकेचे सभासद असणे आवश्यक |

तरी सर्व सभासदांनी याची नोंद घेऊन दि.२५ जुलै २०१६ रोजीपर्यंत आपला सभासद क्रमांक व आपल्या पाल्यांची नावे गुणपत्रिकेसह नजिकच्या शाखेत कामकाजाच्या वेळेमध्ये शाखाव्यवस्थापकांकडे जमा करावीत. सदर तारखेनंतर प्राप्त झालेल्या गुणपत्रिकांचा विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

VAISHYA SAHAKARI BANK LTD. MUMBAI-400 013

– आदेशावरून